महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerberre1@gmail.com website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०१३५०५ फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/मावक/ १५६६४ दिनांक : 2e /0e/2020

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.,
अमरावती/अकोला/औरंगाबाद/भांडुप/बारामती/जळगांव/
चंद्रपूर/गोंदिया/कल्याण/कोल्हापूर/लातूर/नागपूर/नांदेड/
नाशिक/पुणे/रत्नागिरी.

**विषय :** अनुकंपा तत्त्वावरील नोकरीच्या प्रलंबित प्रकरणांबाबत.

---------------

१.. उपरोक्त विषयास अनुसरुन, परिमंडळ कार्यालयांतर्गत नियुक्ती देणे शक्य नसल्याने इतर परिमंडळाकडे नियुक्तीसाठी वर्ग करणेसाठी शिपाई, कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक व कनिष्ठ सहाय्यक (मासं/लेखा) या पदासाठी पात्र असलेल्या अवलंबितांच्या प्रलंबित प्रकरणांची माहिती सांघिक कार्यालयाकडून मागविण्यात आली होती. तसेच ज्या अवलंबितांनी अपूर्ण कागदपत्रे सादर केलेली असून त्यामुळे त्यांची प्रकरणे प्रलंबित आहेत अशा प्रकरणांचीही माहिती मागविण्यात आली होती.

२. उपरोक्त प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत :-

i) सदर माहितीमध्ये ज्या अवलंबितांचे वय वर्षे ६० पूर्ण झाले आहे अशा अवलंबितांची नावे यादीमध्ये समाविष्ट आहेत.

ii) काही अवलंबितांची नावे इतर परिमंडळामध्ये नियुक्तीसाठी वर्ग करणेसाठी कळविणेत आली असून शेऱ्यामध्ये काही कागदपत्रे सादर केलेली नाहीत किंवा प्रस्ताव मंजुरीसाठी सक्षम अधिकाऱ्याकडे सादर केलेबाबत नमूद केले आहे.

iii) अपूर्ण कागदपत्रे सादर केलेल्या अवलंबितांच्या यादीमध्ये कोणती कागदपत्रे सादर केलेली नाहीत याचा उल्लेख केलेला नाही.

iv) तसेच मृत अथवा वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांनी अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी संबंधित कार्यालयाकडे कोणत्याही प्रकारचा संपर्क केलेला नाही किंवा नोकरी मिळणेसाठी अर्ज सादर केलेला नाही, त्या अवलंबितांची नावे अपूर्ण कागदपत्रे सादर केलेल्या प्रलंबित प्रकरणांच्या यादीमध्ये समाविष्ट केलेली आहेत.

३. अनुकंपा तत्वावरील प्रलंबित प्रकरणांबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने खालील सूचना पारित करण्यात येत आहेत.

i) ज्या अवलंबितांनी वयाची ६० वर्षे पूर्ण केलेली आहेत, अशा अवलंबितांना त्यांच्याऐवजी दुसऱ्या पात्र अवलंबिताच्या नावाने १५ दिवसात प्रस्ताव सादर करणेबाबत सूचित करण्यात यावे. जे अवलंबित विहित मुदतीत दुसऱ्या पात्र अवलंबिताबाबत कागदपत्रे संबंधित कार्यालयाकडे सादर करणार नाहीत अशा अवलंबितांना त्यांचे प्रकरणे नस्तीबंद करणेत येत असलेबाबत आपले स्तरावर कळविण्यात यावे.

ii) संपूर्ण कागदपत्रे सादर केल्याची खात्री केल्याशिवाय व सक्षम अधिकाऱ्यांनी प्रस्तावास मंजुरी दिल्याशिवाय इतर परिमंडळामध्ये नियुक्तीसाठी वर्ग करणेसाठीच्या यादीमध्ये नाव समाविष्ट (Add) करणेसाठी पाठविण्यात येऊ नये.



Scanned with CamScanner

iii) अपूर्ण कागदपत्रे सादर केलेल्या अवलंबिताच्या माहितीमध्ये जी कागदपत्रे सादर केलेली नाहीत, त्या सर्व कागपत्रांचा उल्लेख करण्यात यावा.

iv) ज्या अवलंबितांनी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेसाठी कोणत्याही प्रकारचा संपर्क किंवा अर्ज केलेला नाही, अशा अवलंबितांची नावे आपले स्तरावर पुनश्च खात्री करुन प्रलंबित प्रकरणांच्या यादीतून वगळण्यात यावीत.

v) ज्या अवलंबितांची शैक्षणिक अर्हता इयत्ता १० वी, इयत्ता १२ वी, इयत्ता १२ वी व एमएससीआयटी पास आहे, अशा अवलंबितांना शक्य असल्यास वाणिज्य शाखेमधून पदवी संपादन करणेबाबत प्रोत्साहित करण्यात यावे, जेणेकरुन त्यांना कनिष्ठ सहाय्यक (लेखा) पदी नियुक्ती करणे शक्य होईल.

४. वास्तविक पाहता सांघिक कार्यालयाकडे नावे समाविष्ट करणे अथवा वगळणे (Add and Delete) याबाबतची माहिती तसेच अपूर्ण कागदपत्रे सादर केलेल्या अवलंबितांची माहिती पाठविताना उपरोक्त बाबींची पडताळणी परिमंडळ स्तरावर होणे आवश्यक आहे. उपरोक्त कार्यवाहीनुसार ज्या अवलंबितांची नावे वगळावयाची (Delete) आहेत, अशा अवलंबितांची माहिती या कार्यालयास **दि. १०/१०/२०२० पर्यंत** कळविण्यात यावीत. सबब, आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत संबंधितास सूचना द्याव्यात.

**(कमांडर शिवाजी इंदलकर, निवृत्त)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर :-**

१) संचालक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, प्रकाशगड, बांद्रा, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद/कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, पुणे, नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना :-**

मुख्य महाव्यवस्थापक (तां.आस्था.), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, प्रकाशगड, बांद्रा, मुंबई.

**प्रत रवाना :-**

१) महाव्यवस्थापक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, प्रकाशगड, बांद्रा, मुंबई.
२) उप महाव्यवस्थापक (मासं-तां.आस्था.), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, प्रकाशगड, बांद्रा, मुंबई.
३) सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं-अतां.आस्था.), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, प्रकाशगड, बांद्रा, मुंबई.

*DT-14 09 2020*

C:\ANJALI OFFICE (COVID-19 Period)\INFORMATION\CS 28 Pending Information-14 09 2020\All Zone letter docx

Scanned with CamScanner